# दुर्लक्षित लोकांकडे मिशनरी पाठवा


### मुलांना शिकवणाऱ्यांनी S2b हा अभ्यास वाचावा.

**प्रार्थना:** *''प्रिय प्रभू, तुझ्या महान आज्ञेचे पालन करण्यास आणि ख्रिस्तामधील तारणाच्या सुवार्तेपासून वंचित असणाऱ्या लोकांकडे सेवक पाठवण्यासाठी आमचे कृपा करून साहाय्य कर.''*

**१. दुर्लक्षित भागामधील लोकांमध्ये ख्रिस्तासाठी कामाची सुरुवात करण्याची तयारी करा, यामुळे नवीन कळय तयार होतात.**

**सूचना:** *नव्या करारातील यरूशलेम, यापो, अत्युंखिया, रोम, इफिस, कलस्सै आणि इतर शहरांमधील मंडळ्यांनी अन्य ठिकाणी लोकांना शिष्य करण्यासाठी सेवक पाठवले.*

*येशूने आपल्या शिष्यांना चार ठिकाणी जाऊन त्याच्यासाठी साक्ष देण्यास सांगितले होते ते* **प्रे.कृ.१:८** *ह्या वचनात पाहा (उतरः* **यरूशलेम** *(म्हणजे तुमचा स्वतःचा समाज, संस्कृती व भाषा),* **यहूदीया** *(म्हणजे एकाच संस्कृतीतील आजूबाजूचा दुर्लक्षित समाज),* **शोमरोन** *(म्हणजे आजूबाजूचे भिन्न संस्कृतीचे गट),* **पृथ्वीच्या** *शेवटापर्यन्त (अगदी वेगळी संस्कृती असलेले दूरवरचे लोकगट).*



*पौल व बर्णना ह्यांना पाठवण्यासाठी अत्युंखियाच्या मंडळीने काय केले ते* **प्रे.कृ.१३:१-३** *ह्या वचनात पाहा.*

**प्रे.कृत.१३ व १४** *हे अध्याय वाचा आणि नवीन मंडळयांची सुरुवात करण्यासाठी पौल व बर्णबाने काय काय केले त्या सर्व गोष्टी नमूद करा.*

*पौल व बर्णबा हे त्यांना पाठवणाऱ्या मंडळीकडे परत आल्यावर लागलीच त्यांनी काय केले ते* **प्रे.कृ.१४:२६-२८** *ह्या वचनात पाहा.*

*आम्ही सुवार्ता प्रसार करताना कोणत्या गोष्टींची घोषणा केली पाहिजे ते* **लूक २४:४६-४८** *ह्या वचनात पाहा. तुम्ही पाठवणार असलेल्या सेवकांमध्ये काही निश्चित कौशल्ये असणे अगत्याचे आहे. त्यामध्ये पुढील चार कौशल्यांचा समावेश होतोः*

### मिशनरींनी आत्मसात केली पाहिजेत अशी चार कौशल्ये

**कौशल्य १.** *भिन्न संस्कृतीचा स्वीकार करणे.*

- *तुमची स्वतःची मंडळी ज्या पध्दतीने उपासना व सुवार्ता प्रसार करेल त्याच पध्दतीने नवीन विश्वासणाऱ्यांनी करावे असा आग्रह धरू नका.*
- *सांस्कृतिक दृष्टया भिन्न गोष्टींचा आदर करा. ख्रिस्त आणि त्याच्या प्रेषितांच्या आज्ञांचे पालन करणे यापेक्षा अन्य कशाचीही अपेक्षा नवीन विश्वासणाऱ्यांकडून ठेवू नका.*
- *सेवकांना कदाचित वेगळी दुसरी भाषा शिकावी लागेल.*
- *नवीन विश्वासणाऱ्यांना अनुकरण करता येईल आणि इतरांना सांगता येतील अशाच पध्दतींचा उपयोग करा.*
- *नवीन मंडळयांमधील नव्या सेवकांना सहज उपलब्ध होतील अशाच साधनांचा फक्त उपयोग करा.*
- *स्थानिक लोकांशी बांधिलकी ठेवा. त्यांच्यावर प्रेम करा. त्यांच्याशी दोस्ती करा.*

**कौशल्य २.** *सुवार्ता प्रसार अशा पध्दतीने करा की सुवार्ता कुटुंबाकडून कुटुंबाकडे आणि मित्राकडून मित्राकडे अशी 'प्रवाहित' झाली पाहिजे. येशूचे मरण आणि पुनरुत्थान या विषयीचे वृत्तांत नवीन विश्वासणाऱ्यांना अशा पध्दतीने सांगा की ते त्यांना त्यांच्या मित्रांना सांगता आले पाहिजेत. नवीन विश्वासणाऱ्यांना मिळवण्यास किंवा वापरण्यास अवघड पडतील अशी साधने वा पध्दती उपयोगात आणू नका (याला) अपवाद फक्त प्रासंगिक खास घटनांचा).*

**कौशल्य ३.** *नवीन विश्वासणाऱ्यांना येशूच्या आज्ञांचे पालन करण्यास शिकवून त्यांना शिष्य करा. पश्चाताप करा आणि विश्वास ठेवा, बाप्तिस्मा द्या, प्रभुभोजनाचा विधी करा, देव आणि इतरांवर व्यावहारिक मार्गा ने प्रेम करा, प्रार्थना करा, दान द्या आणि शिष्य करा ह्या त्याच्या मुख्य आज्ञा आहेत.*

**कौशल्य ४.** *नव्या करारानुसार नवीन मंडळयांनी विकसित केल्याच पाहिजेत अशा कार्यकृती शिकून घ्याः*

- *इतरांना येशू विषयी सांगा आणि पश्चाताप केलेल्या विश्वासणाऱ्यांना बाप्तिस्मा द्या, लूका २४:४६-४८; प्रे.कृ.२:३८.*
- *नवीन शिष्यांना येशूच्या आज्ञा पाळण्यास शिकवा, मत्तय २८:१८-२०.*
- *एक शरीर म्हणून उपासना करा आणि प्रभुभोजनाचा विधी साजरा करा, मत्तय २६:१६-२८.*
- *प्रार्थना, मध्यस्थीची प्रार्थना व आध्यात्मिक शुध्द करा, कुटुंबांनी एकात्रतपणे प्रार्थना करावी, इफिस ६:१०-१८.*
- *सहभागिता आपुलकीची असेल याकडे लक्ष द्या आणि गरजूची व्यावहारिक मार्गाने सेवा करा, योहान १३:३४.*
- *ख्रिस्त कारभरीपणाचे शिक्षण देऊन ते आचरणात आणा, लूका ६:३८.*
- *विश्वासणाऱ्यांना एकमेकांची आणि त्यांच्या समाजाची सेवा कशी करायची हे शिकवा, इफिस ४:११.*
- *कौटुंबिक जीवन बळकट करा, समस्या सोडवण्यास मदत करा आणि चूक दाखवून ती दुरूस्त करा, २ तीमथ्य ३:१६-१७.*
- *विविध आध्यात्मिक देणग्या असणाऱ्यां विश्वासणाऱ्यांना एकमेकांची सेवा करण्याची संधी दया, १ करिंथ १२.*
- *आजूबाजूला आणि दुर्लक्षित लोकांमध्ये मंडळया व गट सुरु करा, प्रे.कृ.१:८.*
- *पुढाऱ्यांना अशा पध्दतीने प्रशिक्षण द्या की नवीन पुढऱ्यांना शिकवताना ते त्याचेच अनुकरण करीत त्याच पध्दतीने शिकवतील २ तीमथ्य २:२.*

**२. सहकाऱ्यांशी चर्चा करून दुर्लक्षित लोकांच्या गटांकडे सेवक पाठवण्याची योजना आखा.**

*ही महत्वाची कामे पूर्ण करण्यासाठी कदाचित अनेक आठवडयांचा कालावधी लागण्याची शक्यता आहेः*

- *मंडळयांतून मंडळ्या तयार होतील, तिथे तुमच्या सेवकांना जाता येईल असे लोक गट कोणते आहेत ते पाहा.*
- *तुमच्या मंडळीने ज्या लोक गटात जाऊन सुवार्ता सांगण्याये निश्चित केले असेल त्याच्यासाठी प्रार्थना करा.*
- *दुर्लक्षित क्षेत्रांमध्ये जाण्यास तयार असलेले आणि त्यासाठी तयारी करीत असलेल्या विश्वासणाऱ्यांची भेट घ्या. त्यांना तत्काळ आवश्यक कौशल्ये उपयोगात आणण्यास मदत करा. (ही कौशल्ये वर दिलेली आहेत).*
- *दुर्लक्षित क्षेत्रांमध्ये सेवक पाठवण्यात स्वारस्य दाखवणाऱ्या विश्वासणाऱ्यांची भेट घ्या आणि तुम्हांला तयारी करून सेवक पाठवता यावेत यासाठी त्यांची मदत घ्या.*
- *सेवकांचा खर्च कसा भागवला जाणार या विषयी निश्चित निर्णय घ्या. त्यांना तुमच्या किंवा इतर मंडळयांकडून आर्थिक मदत मिळणार का? किंवा ते नव्या करारातील अक्विल्ला व प्रिस्किल्ला आणि पौल यांच्याप्रमाणे स्वतःचा खर्च स्वतःच चालवणार? योग्य धोरण आखा.*
- *तुमच्या मंडळीतील मिशनरी आणि ते सुवार्ता प्रसार करणारा असणारे लोक यांच्यासाठी दर आठवड्याला प्रार्थनासभा आयोजित करा.*
- *मंडळीच्या मिशनरींच्या कामाची प्रगती आणि समस्या यांची माहिती मंडळीला नियमितपणे देण्याची व्यवस्था करा.*
- *इतर पाळकांनी त्यांच्या मंडळयांना प्रोत्साहन देऊन दुर्लक्षित लोकांकडे सेवक पाठवावेत याकरीत त्यांना मदत करा.*
- *तुमच्या विभागातील इतर मंडळयांनी सेवक पाठवावेत यासाठी त्यांना सहकार्य करा.*

**३. सहकाऱ्यांशी चर्चा करून पुढील उपासना सभेची तयारी करा.**

*अत्युंखियामधील विश्वासणाऱ्यांनी पौल व बर्णबाला कसे पाठवले आणि त्यांनी लोकांना कसे शिष्य केले ते* **उलगडून सांगा.**

*सेवकांची तयारी करून त्यांना पाठवण्या बद्दलच्या तुमच्या मंडळीच्या योजना सांगा.*

*पाठवण्यात येणाऱ्या सेवकांकडे कोणती कौशल्ये असणे आवश्यक आहे त्याची* **उजळणी करा.**

**मुलांनी** *तयार केलेला कार्यक्रम त्यांनी सादर करावा.*

**प्रभुभोजनापूर्वी** *यिर्मया ३१:३१-३४ हा शास्त्रभाग वाचा. आपण भाकर मोडतो तेव्हा संदेष्टयाने येशूच्या रक्तावर आधारलेल्या नव्या कराराचे भाकित आम्ही प्रसिध्द करतो.*

*दोन किंवा तीनजणांचे* **गट** *तयार करून सेवक पाठवण्या विषयी प्रार्थना करून या योजनेवर चर्चा करा.*

*एकत्रित* **पाठ करा** *मत्तय २८:१९-२०.*

**दुर्लक्षित लोक गय**

*तुमच्या आसपास आणि दूरवर जमाती, समाज, शहरे आणि प्रांत आहेत की तेथे त्यांच्याच लोकांना येशूची सुवार्ता सांगण्यासाठी पुरेसे ख्रिस्ती लोक व मंडळ्या नाहीत. तेथील संख्येने थोडके असणारे विश्वासणारे प्रभूकडे विनंती करीत आहेत की सुवार्ता सांगण्यासाठी आणि मंडळयातून मंडळ्या निर्माण करणाऱ्या नव्या मंडळया सुरु करण्यासाठी मदत म्हणून त्याने तुमच्यासारखे लोक पाठवावेत.*

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net